# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः29.09.2025** **वारःसोमवार**

1. मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये जोरदार पाऊस; धरणांमधून मोठ्या प्रमाणावर विसर्गामुळे अनेक भगत पूरस्थिती; मुख्यमंत्र्यांनी घेतला मदतकार्याचा आढावा
2. सण-उत्सवांच्या काळात स्वदेशी उत्पादनांचीच खरेदी करा, पंतप्रधानांचं मन की बातमधून आवाहन
3. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात ज्येष्ठ व्यंगचित्रकार शि. द. फडणीस यांच्या नावाने अध्यासन सुरू होणार आणि
4. आशिया चषकावर भारताची नवव्यांदा मोहोर

**<u>पाऊस</u>**

राज्यात कालही मराठवाड्यासह बहुतांश भागात पावसाचा जोर होता. ठिकठिकाणची धरणं भरल्यानं किंवा त्यांच्या पाणी पातळीत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यानं पाण्याचा विसर्ग वाढवण्यात आला. त्यामुळे नद्यांना पूर आले आहेत. या पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मराठवाड्यातल्या आठ जिल्ह्यांसह सोलापूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधून मदतकार्याचा आढावा घेतला. धरणांमधून विसर्ग वाढवण्याआधीच नदीकाठच्या नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्याकडे लक्ष द्यावं, आणि सर्व अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष त्या त्या जागी राहून काम करावं, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही ठाण्यासह कोकण विभागातील जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीचा काल आढावा घेतला आणि आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी सज्ज राहण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाला दिले. दरम्यान मराठवाड्यात कालही पावसाचा कहर होता. पैठणच्या जायकवाडी धरणाचे सर्व 27 दरवाजे उघडले असून गोदावरी नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर विसर्ग करण्यात येत आहे.

**<u>धाराशिव</u>** जिल्ह्यातील परंडा तालुक्यातील सिना कोळेगाव धरणातून सुरू असलेला विसर्ग काल संध्याकाळी मोठ्या प्रमाणात वाढवण्यात आला. धाराशिव जिल्ह्यात अतिवृष्टी आणि पुरामुळे चार जणांचा बळी गेला असून 81 जनावरं दगावली आहेत. **<u>हिंगोली</u>** जिल्ह्यातल्या खडकपूर्णा धरणाचे 10 दरवाजे तर इसापूर धरणाचे 13 दरवाजे उघडण्यात आले.

**<u>जालना</u>** जिल्ह्यात भोकरदन, जाफराबाद, घनसावंगी तालुक्यात पुराचं पाणी शेतशिवारात शिरून पिकं पाण्याखाली गेली. **<u>नांदेड</u>** जिल्ह्यात कालही गंभीर पूर परिस्थिती होती. अतिवृष्टी आणि महापुरात एकाचा बळी गेला आहे. नांदेड शहरातील अनेक भागात पुराचं पाणी शिरल्यानं 970 नागरिकांना निवारा केंद्रात हलवण्यात आलं आहे. ग्रामीण भागातही एक हजाराहून अधिक नागरिकांना स्थलांतरित करण्यात आलं आहे.

**<u>अहिल्यानगर</u>** जिल्ह्यात परवापासून झालेल्या पावसामुळे जिल्ह्यातील अनेक नद्यांना पूर आला आहे. शहराच्या जवळून वाहणाऱ्या सीना नदीला आलेल्या पुराचं पाणी थेट नालेगाव भागातील दुकानामध्ये शिरलं आहे. या भागातील नागरिकांची आपत्ती निवारण दल आणि नागरिकांच्या मदतीने होड्यांमधून सुटका करण्यात आली. जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यातील देवटाकळी इथं पुराच्या पाण्यात अडकलेल्यांना हेलिकॉप्टरच्या मदतीने बाहेर काढण्यात आलं. पाथर्डी तालुक्यातील करंजी इथं पुन्हा पूर आल्यानं पाणी गावात शिरलं. अहिल्यानगर जिल्ह्यातले अनेक रस्ते काल बंद झाले होते.

**नाशिक** जिल्ह्यातील बागलाण तालुक्यात टेंभे इथं काल वादळी वारा आणि वीजेमुळे घराची भिंत कासळून तीन जणांचा मृत्यू झाला. कोळगाव आणि दावलेश्वर इथं पुराच्या पाण्यात अडकलेल्यांची आपत्ती व्यवस्थापन विभागानं सुटका केली. **लातूर** जिल्ह्याच्या अनेक गावांत पाणी शिरलं आणि अहमदपूर शहराशी अनेक गावांचा संपर्क तुटला होता.

**ठाणे** आणि **पालघर** जिल्ह्यात काल जोरदार वारे, आणि विजांसह पाऊस पडला. येत्या 2 दिवसात राज्यात बहुतांश ठिकाणी पावसाचा अंदाज आहे. तुरळक ठिकाणी विजांसह सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता आहे.

दरम्यान राज्याच्या अनेक भागात पुराच्या आपत्तीचा फटका बसलेल्यांना आधार देण्यासाठी समाजाच्या विविध भागातून मदतीचे हात पुढे येत आहेत. आपत्तीग्रस्तांच्या मदतीसाठी शेगावच्या श्री गजानन महाराज देवस्थाननं एक कोटी 11 लाख रुपयांची मदत मुख्यमंत्री सहाय्यता निधीला दिली आहे. अतिवृष्टीमुळे **सोलापूर** जिल्ह्यातही हजारो कुटुंबांवर मोठं संकट कोसळलं आहे. त्यांच्यासाठी मिरज विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणावर मदत सामग्री जमा करून पूरग्रस्त भागात तातडीनं पोहोचवली आहे.

**सेवापर्व-रेल्वे सेवा**

सेवा आणि सुशासन, या मंत्रानुसार काम करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार देशात परिवर्तन आणि प्रगती घडवून आणण्यासाठी अथक प्रयत्न करत आहे. 'सेवा पर्व' या विशेष मालिकेत आज ऐकुया गेल्या दशकात रेल्वेसेवेत झालेल्या सुधारणांची माहिती....

**गेल्या दशकात भारतीय रेल्वेमध्ये अनेक पातळ्यांवर क्रांतिकारी सुधारणा झाल्या आहेत; त्यामुळे देशाची जीवनरेखा अशी ओळख असलेली रेल्वे आता देशाच्या विकासाचं केंद्र झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या काळात काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत रेल्वे जाळं तयार करण्यात आलं आहे. याबाबत बोलताना पंतप्रधान म्हणतात....**

**वंदे भारत, अमृत भारत, नमो भारत रॅपिड रेल अशा विविध रेल्वे, प्रवाशांना अधिक आरामदायी, सुरक्षित आणि उत्कृष्ट दर्जाचा प्रवास अनुभव देत आहेत. अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत 1300 हून अधिक स्थानकांचा पुनर्विकास केला जात आहे. रेल्वेच्या सुरक्षित संचलनासाठी भारतीय रेल्वेने कवच ही अत्याधुनिक स्वयंचलित प्रणाली सुरू केली आहे. तसंच भविष्यवेधी, किफायतशीर, सुरक्षित आणि विश्वासार्ह सेवा देण्यासाठी राष्ट्रीय रेल्वे योजनाही तयार करण्यात आली आहे.**

**मन की बात**

आगामी सण-उत्सवांच्या काळात स्वदेशी उत्पादनांचीच खरेदी करा, असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल देशवासियांना केलं. आकाशवाणीवरील 'मन की बात' या कार्यक्रमाच्या 126 व्या भागात त्यांनी श्रोत्यांशी संवाद साधला. येत्या 2 ऑक्टोबरला महात्मा गांधी यांची जयंती साजरी करताना खादीची उत्पादनं खरेदी करा; जीएसटी सुधारणांमुळे बचत उत्सव साजरा होत असताना, व्होकल फॉर लोकल, हा खरेदीचा मंत्र बनला पाहिजे, असं ते म्हणाले.....

**आने वाले दिनों में एक के बाद एक त्योहार और खुशियां आने वाली हैं। हर पर्व पर हम खरीदारी भी खूब करते हैं। और इस बार तो जीएसटी बचत उत्सव भी चल रहा है। अगर हम ठान लें कि इस बार त्योहार सिर्फ स्वदेशी चीजों से ही मनाएंगे, तो देखिएगा, हमारे उत्सव की रौनक कई गुना बढ़ जाएगी। वोकल फॉर लोकल को खरीदारी का मंत्र बना दीजिए। ठान लीजिए, हमेशा के लिए, जो देश में तैयार हुआ है, वही खरीदेंगे।**

हुतात्मा भगतसिंग आणि ज्येष्ठ गायिका लता मंगेशकर यांच्या जन्मदिनानिमित्त पंतप्रधानांनी त्यांच्या कार्याचा गौरव करून त्यांना अभिवादन केलं. नवरात्रोत्सवानिमित्त महिला शक्तीचं महत्त्व अधोरेखित करत; नौदलाच्या दीर्घ सागरी सफरीत

सहभागी झालेल्या लेफ्टनंट कमांडर दिलना आणि लेफ्टनंट कमांडर रुपा यांच्याशी पंतप्रधानांनी संवाद साधला. लोकप्रिय आसामी गायक जुबीन गर्ग आणि प्रसिद्ध कन्नड साहित्यिक एस.एल. भैरप्पा यांना पंतप्रधानांनी आदरांजली वाहिली.

**शि. द. फडणीस अध्यासन**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात ज्येष्ठ व्यंगचित्रकार शि.द. फडणीस यांच्या नावाने व्यंगचित्र अध्यासन सुरू करण्यात येईल, अशी घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी काल पुण्यात केली. शेलार काल पुणे दौऱ्यावर आले असताना त्यांनी ज्येष्ठ व्यंगचित्रकार शि. द. फडणीस यांची त्यांच्या निवासस्थानी जाऊन सदिच्छा भेट घेतली आणि त्यांना शुभेच्छा दिल्या.

**निधन-लातूर**

ज्येष्ठ साहित्यिक भास्कर चंदनशिव यांचं काल सकाळी लातूर इथं निधन झालं. ते 80 वर्षांचे होते. ग्रामीण साहित्यात वेगळी कथा लिहून त्यांनी ग्रामीण समाजातली स्थित्यंतरं चित्रित केली. त्यांच्या नावावर पाच कथासंग्रह, ललित, समीक्षा आणि संपादित ग्रंथ आहेत. 28 व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचं अध्यक्षस्थानही त्यांनी भूषवलं होतं.

**क्रिकेट**

दुबई इथ काल झालेल्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत भारतानं पाकिस्तानवर विजय मिळवला. या विजयाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय संघाचं अभिनंदन केलं आहे. अंतिम सामन्यात भारताने पाकिस्तानवर 5 गडी राखून विजय मिळवला नवव्यांदा आशिया चषकावर आपलं नाव कोरलं. भारताने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. 147 धावांचं आव्हान जिंकण्यासाठी भारतीय संघापुढे होतं. कुलदीप यादवने चार, जसप्रित बुमराह, वरुण चक्रवर्ती आणि अक्षर पटेलने प्रत्येकी दोन गडी बाद केले. उत्तरादाखल भारताने दोन चेंडू बाकी असताना पाच गड्यांच्या मोबदल्यात विजय हा मिळवला. भारतीय कर्णधार सुर्यकुमार यादव ने मालिकेत मिळालेली रक्कम भारतीय सेनेला देण्याची घोषणा केली.

**हवामान**

कोकणात मुसळधार तर, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि वीजांसह हलका ते मध्यम पास पडण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.